# भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सह्योगीत
# ग्रामिण कृषि मौसम सेवा
# कृषी-हवामान क्षेत्र एकक
## उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

| अंक ०१/२०२० | दिनांक ०४.०६.२०२० |
|---|---|

## "निसर्ग" चक्रीवादळोत्तर हवामानाधारित कृषी सल्ला पत्रक

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | निसर्ग या चक्रीवादळामुळे बऱ्याच ठिकाणी मुसळधार पाऊस झाला आहे व ज्या ठिकाणी भात पिकाची पेरणी झाली होती व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल. |
| आंबा | काढणी व नवीन लागवड | निसर्ग या चक्रीवादळामुळे बऱ्याच ठिकाणी मुसळधार पाऊस झाला असल्याने व हवेतील आर्द्रतेचे प्रमाण वाढले असल्यामुळे आंबा पिकावरील नवीन पालवीवर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे व प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे.<br>चक्रीवादळ येण्यापूर्वी व सध्या परिस्थितीत काढणी केलेल्या आंबा फळास आर्द्र वातावरणामुळे फळकूज या रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो, प्रादुर्भाव टाळण्यासाठी व हापुस आंब्याच्या काढणी पश्चात फळकुज रोगाचे प्रभावी नियंत्रण करण्यसाठी फळे पोटॅशिअम मेटाबायसल्फाईट (०.०५%) या रसायनाच्या ५० अंश सेल्सीअस उष्णजल द्रावणात १० मिनिटे बुडवून नंतर पिकत ठेवावीत.<br>चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी नवीन लागवड केलेली रोपे पडली असल्यास त्यास काठीने आधार द्यावा<br>आंबा बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| काजु | नवीन लागवड | चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी नवीन लागवड केलेली रोपे पडली असल्यास त्यास काठीने आधार द्यावा<br>चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी काजू बागेतील झाडांचे फांद्या मोडून नुकसान झाले आहे, मोडलेल्या फांद्या काढून घ्याव्यात व त्या ठिकाणी बोर्डो पेस्ट लावण्याची व्यवस्था करावी<br>चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी काजू बागेतील झाडांचे फांद्या मोडून नुकसान झाले आहे अश्या मोडलेल्या फांद्या काढून घ्याव्यात व जखम झालेल्या ठिकाणी रोठा या किडीचा प्रादुर्भाव होऊ शकतो प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| नारळ | नवीन लागवड | चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी नवीन लागवड केलेली रोपे पडली असल्यास त्यास काठीने आधार द्यावा<br>नारळ बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| सुपारी | नवीन लागवड | चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी नवीन लागवड केलेली रोपे पडली असल्यास त्यास काठीने आधार द्यावा<br>सुपारीच्या बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| भाजीपाला | पेरणी/लागवड | शेतातील पाण्याचा निचरा झाला असल्यास व जमीन वापश्याच्या स्थितीत असताना भाजीपाला पीकांमध्ये मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, काकडी, कारली, पडवळ, चिबुड, शिराळी ई. पीकांची पेरणी/लागवड करावी लागवड करण्यास योग्य हवामान असुन पाऊसाचा अंदाज पाहुन पेरणी करावी. तसेच पेरणीसाठी सुधारीत जातीचे बियाणे वापरावे. भेंडीची लागवड सरी-वरंब्यावर करावी. वेलवर्गीय भाजीपाला पीकांसाठी मातीचे ऊंचवटे करुन त्यावर मध्यभागी लागवड करावी. |
| सर्वसाधारण | | निसर्ग चक्री वादळाच्या तडाख्यामुळे जर आपल्या परिसरात इलेक्ट्रिक खांब कोसळला असल्यास, वीज वाहिनी तुटल्यास किवा रोहित्र जळाल्यास महावितरणच्या टोल फ्री नंबर १८०० २३३ ३४३५ / १८०० १०२ ३४३५ / १९१२ वर त्वरित कळवा. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.**


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|